





महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)/शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि.२८/१०/२०२६

संदर्भ :-महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक. सीटीई -३६१८/प्र. क्र.०९ / पोल-३, दि.२१/०९/२०२६ .

विषय :- अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती) यांचे स्टाफ ऑफिसर या अस्थायी पदास मुदत- वाढ देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक.सीटीई-३६१८/प्र. क्र.०९/पोल-३,दि.२१/०९/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०९२११६५९३१९९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(अनिता राठोड)
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

विशेष पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय),महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक, नि.व स. महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक.(पुनवर्सन)
कार्यासन अधिकारी, का क्र.२६-ब.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके "सर्वसाधारण" सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती) यांचे स्टाफ ऑफिसर या अस्थायी पदास मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : सीटीई-३६१८/प्र.क्र.०९/ पोल-३
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ सप्टेंबर, २०२६.

वाचा:-

१) शासन निर्णय, गृह विभाग क्र.रापोसे-०१/२००१/प्र.क्र.४३/पोल-१अ, दि.११.०५.२००१.
२) शासन निर्णय, गृह विभाग क्र.रापोसे-१३०८/प्र.क्र.२२८/पोल-१अ, दि. २२.१०.२००९.
३) शासन निर्णय, गृह विभाग क्र.रापोसे-१७१६/प्र.क्र.१९७ (१)/पोल-१अ, दि. ०७.०६.२०१६.
४) शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीटीई-३६१८/प्र.क्र.०९/पोल-३, दि.०१.०४.२०२६.
५) पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/पोअ-वि.कृ./ मुदतवाढ/३७/ २०१७, दि.१६.०७.२०२६.
६) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.३१.०८.२०२६.

शासन निर्णय:-

राज्य पोलीस दलाच्या पुनर्रचनेअंतर्गत उपरोक्त संदर्भाधिन क्रमांक १ येथील नमूद दिनांक ११.०५.२००१ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे पोलीस अधीक्षक/पोलीस उपआयुक्त या संवर्गात ३० पदे निर्माण करण्यात आली आहेत. सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टात नमूद ३० पदांपैकी अ.क्र.१३ ते १९ येथे नमूद अतिरिक्त समादेशक, राज्य राखीव पोलीस बल या ७ पदांचे उपरोक्त संदर्भाधिन क्रमांक २ येथे नमूद दिनांक २२.१०.२००९ च्या शासन निर्णयाव्दारे फेरवाटप करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर फेरवाटप केलेल्या ७ पदांपैकी अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती) यांचे स्टाफ ऑफिसर या अस्थायी पदास उपरोक्त संदर्भाधिन क्रमांक ४ येथील नमूद दिनांक ०१.०४.२०२६ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे दिनांक ०१.०३.२०२६ ते दिनांक ३१.०८.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधिन क्रमांक ५ येथील नमूद दिनांक १६.०७.२०२६ रोजीच्या पत्राव्दारे अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती) यांचे स्टाफ ऑफिसर या अस्थायी पदास दिनांक ०१.०९.२०२६ पासून पुढील मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

२. उक्त पद ज्या परिस्थितीत निर्माण करण्यात आले होते ती परिस्थिती अद्यापही कायम आहे. म्हणून, उक्त अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती) यांचे स्टाफ ऑफिसर या अस्थायी पदास **दिनांक ०१ सप्टेंबर, २०२६ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत** खालील अटीच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१) सहा महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त पदे वगळून उर्वरित पदांना मुदतवाढ देण्यात यावी. तसेच पदे ज्या कारणास्तव ज्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर केली आहेत, त्याचे पालन करण्यात यावे.

३. सदरचा खर्च "२०५५-पोलीस, ००१संचालन व प्रशासन, (००) (०१) पोलीस निरीक्षणालये" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक-पदनि-२०१६/ प्र.क्र.८/१६/ आ.पु.क., दि.३१.०८.२०२६ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९२११६५९३१९९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NAGNATH RAMCHANDRA JADHAV

Digitally signed by NAGNATH RAMCHANDRA JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=13C3ACFAE7FC8126CE285621D58425C075E0F60C5F67596D7F7181EA8CC9011E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=43D41039958F4FA2CBAEB247FAE932CC6267D47DE282ACE9AEFCEA0F0CAC955E, cn=NAGNATH RAMCHANDRA JADHAV
Date: 2026.09.21 17:00:25 +05'30'

(नागनाथ रा. जाधव)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती दल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा),महाराष्ट्र-१, मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
६. जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई.
७. गृह विभाग, कार्यासन (पोल-१अ).
८. वित्त विभाग (व्यय-७) / वित्तिय सुधारणा-१.
९. निवड नस्ती (पोल-३).